





www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199

Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-४२ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. ७ जुलै २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -६

# बा विठ्ठला: बळीराजाला सुखी व समाधानी ठेव, राज्यावरील संकटे दूर कर

## - मुख्यमंत्र्यांचे विठ्ठल चरणी साकडे

**पंढरपूर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पांडुरंगाने राज्यावरची संकटे दूर करण्याची शक्ती द्यावी, सन्मार्गाने चालण्याची सुबुद्धी द्यावी, बळीराजाला सुखी समाधानी करण्याकरिता आशीर्वाद द्यावा, असे साकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घातले.

आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी श्री कैलास दामु उगले, सौ. कल्पना कैलास उगले यांच्या समवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्री महोदय यांच्या सत्कार प्रसंगी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सौ. अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, आमदार संजय सावकारे, आमदार देवेंद्र कोठे, आमदार अभिजीत पाटील, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्यासह समितीचे सर्व सदस्य व अन्य मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, वारीची परंपरा सातत्याने वाढत आहे आणि यावर्षी तर वारीने एक नवीन विक्रम केलेला आहे. इतक्या मोठ्या प्रमाणात वारकरी या वारीमध्ये चालत पांडुरंगाच्या दर्शनाकरीता या ठिकाणी आले. ज्या दिंड्या आहेत त्या सोबत तर वारकरी आलेच परंतु पायी चालत ही मोठ्या प्रमाणात वारकरी आले. विशेषत: या वारकऱ्यांमध्ये तरुणांची संख्या मोठी



आहे. शासन व प्रशासनाने वारकऱ्यांना चांगल्या सुविधा दिल्या आहेत. पालकमंत्री गोरे यांच्या नेतृत्वात प्रशासनाने चांगले जर्मन हँगर तयार केल्याने वारकऱ्यांसाठी चांगली व्यवस्था झाली, असे त्यांनी सांगितले.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पांडुरंगाची पूजा करायला मिळणे हा सर्वांच्या जीवनातला आनंदाचा क्षण आहे. दिंड्या सोबत अनेक वारकरी स्वयंप्रेरणेने पायी चालत आले. वारीत प्रत्येक व्यक्ती इतरांमध्ये पांडुरंग पाहतो, ही प्रथा जगाच्या पाठीवर कुठेही नाही. वारीत हरीनाम गजर करतांना नवी ऊर्जा मिळते. वारीने खऱ्या अर्थाने भागवत धर्माची पताका उंचावत ठेवली आहे. ही आपली संस्कृती अलौकिक आहे असे सांगून मानाच्या वारकऱ्यांना पांडुरंगाचा आशीर्वाद मिळत राहो, अशी सदिच्छा श्री. फडणवीस यांनी व्यक्त केली.

निर्मल वारीच्या माध्यमातून अतिशय चांगला आवश्यक व्यवस्था उपलब्ध केल्याने कुठेही अस्वच्छता पाहायला मि ळाली नाही आणि निर्मल वारी सोबत हरित, पर्यावरण पूरक वारीदेखील झाली. खऱ्या अर्थाने आपल्या संतांनी जो स्वच्छतेचा संदेश दिलेला आहे तो या वारीमध्ये प्रत्यक्ष अनुभवायला मिळाला. राज्याच्या गतीमध्ये अध्यात्मिक प्रगती महत्त्वाची असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्र्यांनी आणि जिल्हा प्रशासनाने व्हीआयपी दर्शन बंद करण्याचा निर्णय घेतला, त्यामुळे सर्वसामान्य भाविकांचा श्री विठ्ठल दर्शनाचा कालावधी पाच तासाने कमी झाल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले.

प्रारंभी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रस्तावित केले. यामध्ये यावर्षीच्या आषाढी वारीमध्ये शासन व जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी खूप चांगल्या सुविधा दिल्यामुळे वारकरी वर्ग समाधानी असून वारकऱ्यांची संख्या वाढली आहे व त्यावर योग्य नियंत्रण ठेवले जात असल्याचे त्यांनी सांगितले. शासकीय म हापूजेचे मानाचे वारकरी मु.पो. जातेगांव ता. नांदगांव जि. नाशिक येथील कैलास उगले आणि कल्पना उगले या वारकरी दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडवणीस यांच्या हस्ते महापुजेनंतर यथोचित सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना मोफत वर्षभर एसटी पास मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते वितरित करण्यात आला.

## 'जे अनेकांना जमलं नाही, ते देवेंद्र फडणवीसांना जमलं'

# मराठीसाठी ठाकरे बंधू एकत्र

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

हिंदी सक्तीच्या निर्णयाला झालेल्या विरोधानंतर सरकारनं हा निर्णय रद्द केला. या विरोधात राज आणि उद्धव ठाकरे एकत्र मोर्चा काढणार होते. पण निर्णय रद्द झाल्यानंतर मोर्चाऐवजी विजयी मेळावा झाला.

या मेळाव्यात शिवसेना उबाठा, मनसे आणि इतर राजकीय पक्षांचेही काही नेते उपस्थित होते.'कुठल्याही भांडणापेक्षा आणि वादापेक्षा महाराष्ट्र मोठा आहे. २० वर्षांनी आम्ही एकत्र येतोय. जे बाळासाहेबांना जमलं नाही, जे अनेकांना जमलं नाही. ते देवेंद्र फडणवीसांना जमलं', असं विधान मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केलं.



तर, 'आमच्यातला अंतरपाट अनाजीपंतांनी दूर केला, आता एकत्र आलोय, ते एकत्र राहण्यासाठी. आता आम्ही दोघं मिळून तुम्हाला फेकून देणार,' असं विधान उद्धव ठाकरे यांनी केलं. असं असलं तरी या दोघांच्या एकत्र येण्यानं नक्की काय होणार, या मेळाव्यातून कोणाला संदेश दिला गेला, हे प्रश्न शिल्लक राहतातच.

**काय म्हणाले उद्धव आणि राज ठाकरे?**- वरळी येथे झालेल्या मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी भाजपावर तसेच एकनाथ शिंदे यांच्यावर सडकून टीका केली. 'महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्ये भाजपानं 'बटेंगे तो कटेंगे'सारख्या घोषणा देऊन, लोकांमध्ये भांडणं लावून निवडणूका जिंकल्या आहेत. भाजपा हे राजकारणातले व्यापारी आहेत. ते वापरून फेकून देतात.'

'एका गद्दारानं काल 'जय गुजरात'ची घोषणा दिली. आपला मालक आल्यावर 'जय गुजरात' म्हणणारा माणूस मराठीचा पाईक कसा असू शकेल?' असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर टीका केली. एकत्र आलोय, एकत्र राहण्यासाठी

'कोणावर अन्याय करू नका. पण अंगावर हात उगारला, तर तो हात जागेवर ठेवू नका, असं बाळासाहेब ठाकरे म्हणायचे. मराठी भाषेच्या नावावर गुंडगिरी करू नका म्हणता, पण मराठी माणसानं महाराष्ट्राबाहेर कधी दादागिरी केली आहे?' 'वाटेल ते करा.

पण मी महाराष्ट्राला विनंती करतोय. कोणत्याही पक्षाचे आपण असू, पण आता संयुक्त महाराष्ट्राच्या एकजुटीप्रमाणे एकजूट केली पाहिजे. भाजपातल्या मराठी लोकांनीही त्यात यायला हवं. मराठीचे हे धिंडवडे काढणार असले आणि आपण त्यांना पायघड्या घालणार असू, तर मेलेलं बरं.'

'आम्ही दादागिरी करणार नाही, कुणी दादागिरी केली, तर सहन करणार नाही. सर्व मतभेद गाडून मराठी माणसाची भक्कम एकजूट बांधा. सर्व मराठीप्रेमींनी तुटू नका, फुटू नका, मराठी ठसा पुसू नका हे विसरू नये.'

# खंडपीठ वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. योगिता थोरात क्षीरसागर

**दिनेश परदेशी**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठ वकील संघाच्या अध्यक्षपदी ॲड. योगिता थोरात क्षीरसागर विजयी झाल्या. त्यांना ६३७ मते मिळाली. सचिवपदी ॲड. श्रीकृष्ण चौधरी यांची निवड झाली. त्यांना ६६६ मते मिळाली. उपाध्यक्षपदी ॲड. संदिपान मोरमपल्ले आणि पूनम बोडखे-पाटील बिनविरोध निवडून आले. सहसचिवपदी ॲड. निसर्गराज गर्जे आणि ॲड. रंजिता बारहाते निवडून आले. त्यांना अनुक्रमे ८०६ आणि ७८७ मते मिळाली.

कोषाध्यक्षपदी ॲड. विनायक सोळंके निवडून आले. त्यांना ७४१ मते मिळाली. ग्रंथालय चेअरमनपदी ॲड. पंडित आणेराव व ग्रंथालय सचिवपदी ॲड. नानासाहेब भागवत बिनविरोध निवडून आले. तसेच महिला सदस्यपदी अड. कृष्णाबाई भांडे आणि सुल्ताना



रहीम खान या बिनविरोध निवडून आल्या. सदस्यपदी ॲड. चेतन चौधरी (१०७३ मते), ॲड. रवी गिते (९२६ मते), ॲड. सतीश काळे (८५० मते), ॲड. विजय काळे (९७३ मते), ॲड. विष्णू कांदे (९४८ मते), ॲड. ईश्वर नरोडे-पाटील (९४७ मते) आणि ॲड. शिवानंद टेकवाड (९०५ मते) विजयी झाले.

मुख्य निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. प्रल्हाद बचाटे काम पाहत असून निवडणूक अधिकारी म्हणून ॲड. कम लाकर सूर्यवंशी, ॲड. ज्ञानेश्वर बागुल, ॲड. रश्मी कुलकर्णी, ॲड. मिथुन भास्कर, ॲड. धैर्यशील माने, ॲड. आर. डी. सानप, ॲड. विजय देशमुख, ॲड. ललित महाजन, ॲड. योगेश बोलकर, ॲड. पवन इप्पर, ॲड. विष्णू मदन पाटील, ॲड. एडवोकेट ॲड. अम ेय सबनीस, आदींनी सहकार्य केले.



"मी व माझ्या सर्व सहकाऱ्यांच्या माध्यमातून वकीलांच्या अडचणी पूर्णपणे समजून त्यांच्यावर तोडगा काढून सर्व कामे सुरूळीत करणार तसेच पार्किंगचा नेहमी भेडसावणारा प्रश्न निकाली कसा लावता येईल. यावर प्रतिबंधात्मक काम करणार, केसेस पेंडिंग पडणार नाही यासाठी बॅचेस वाढविण्याची मागणी ही आम्ही करू पुनश्च एकदा मी सर्वांचे आभार मानते.

**- ॲड. योगिता थोरात क्षिरसागर**
अध्यक्षा, औरंगाबाद, खंडपीठ वकील संघ

" अनेक प्रकरणे लवकरात लवकर निकाली कसे काढता येतील? याकडे विशेष लक्ष देवू. पक्षकाराला व वकिलालाही याचा त्रास होते. अध्यक्षांशी चर्चा करून वकिलांच्या ॲडमिस्ट्रेशन हे पूर्णपणे ऑनलाईन करू, तसेच त्यासाठी एक नवीन ॲप देखील तयार करू, जेणे करून संपूर्ण वकील संघाचे काम ऑनलाईन होईल.

**- ॲड. पूनम बोडखे पाटील**
उपाध्यक्षा,
वकील संघ

संपादकीय

# डेंग्यु : नियंत्रण व उपाययोजना

**दरवर्षी** सातत्याने डेंग्यु रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. जगामध्ये जवळपास ५ कोटी लोकांना या रोगाचा संसर्ग होतो. भारतातही हा रोग मोठ्या प्रमाणात आढळून येतो. या रोगामध्ये मृत्यू सुद्धा होतात. शहरी व दाट लोकवस्तीच्या भागात या रोगाचे प्रमाण अधिक आहे. या आजाराचा फैलाव ग्रामीण भागामध्ये सुद्धा आहे. या रोगाचीक साथ पावसाळ्यात जास्त प्रमाणात होते.

हा रोग विषाणूजन्य रोग (अरबो व्हायरस) आहे. डेंग्यु विषाणूचे डेंग्यु - १, डेंग्यु - २, डेंग्यु - ३, डेंग्यु - ४ असे चार प्रकार आहेत.

प्रसार :- या रोगाचा प्रसार दुषित एडीस इजिप्ती नावाची मादी डास चावलेल्यामुळे निरोगी व्यक्तीला डेंग्यु रोग होतो. डेंग्यु विषाणुयुक्त डास मरेपर्यंत दुषित राहून अनेक व्यक्तीना चावून या रोगाचा प्रसार करतो. डासाच्या शरीरात डेंग्यु विषाणुची वाढ साधरणत: ८ ते १० दिवसांत पूर्ण होते. या रोगाचे प्रसारक एडिस इजिप्ती डास साठविलेल्या स्वच्छ पाण्यांत उदा. रांजण माठ, कुलर्स, पाण्याचे हौद, घराच्या छतावरील टाकाऊ वस्तु, नारळाच्या कुरवंट्या, टायर इ. मध्ये पैदा होतात. हे डास दिवसा चावतात. या डासांच्या पायांवर काळे पांढरे रिंग असतात. म्हणून या डासांना टायगर मॉस्क्युटो सुद्धा म्हणतात.

जीवनचक्र :- एडिस इजिप्ती डासाची वाढ चार प्रकारामध्ये होते. उदा. अंडी, अळी, कोष, डास.

अधीशयन काळ :- ५ ते १० दिवसांचा आहे.

**आजाराची लक्षणे :-**

अ. डेंग्यु ताप -एकाएकी तीव्रताप, तीव्र डोके दुखी, स्नायुदखी, सांधेदुखी, उलट्या होणे.दुसऱ्या दिवसापासून तीव्र डोळे दुखी, अशक्तपणा भूक मंदावणे, ताप कमी जास्त होणे.अंगावर पुरळ येणे.

ब.रक्तस्त्रावयुक्त डेंग्यु ताप (डेंग्यु हिमोरेजिक फिचर)

१. डेंग्यु तापाची वरीलप्रमाणे लक्षणे आढळून येतात.

२. त्वचेखाली रक्तस्त्राव होणे.

३. नाकातून रक्तस्त्राव होणे. रक्ताची उलटी होणे.

४. रक्तमिश्रीत किंवा काळसर रंगाची शौचास होणे. पोट दुखणे.

५. रक्तस्त्रावयुक्त डेंग्युताप बहुतांशी १५ वर्षाखालील मुलांना होतो. मोठ्या व्यक्तींनाही होऊ शकतो.

क) डेंग्यु शॉक सिंड्रोम:- डेंग्यु मध्ये जेव्हा रुग्ण बेशुद्ध होतो त्याला डेंग्यु शॉक सिंड्रोम असे म्हणतात यामध्ये मृत्यूचे प्रमाण जास्त असते.

रोग निदान- रक्तजल नमुना तपासणी:- रक्तजल चाचणी सुक्ष्मजीव शास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, (घाटी) छत्रपती संभाजीनगर येथे तपासणी करुन निश्चित रोगनिदान होते.

उपचार:- या आजारावर निश्चित असे उपचार उपलब्ध नाहीत. वैद्यकीय अधिकारी यांच्या सल्लानुसार वेदनाशामक औषधे व विश्रांती घेणे आवश्यक आहे. अतिशय घाम येणे, वारंवार उलट्या होणे, जिभेला कोरड पडणे अशा परिस्थितीत ओ.आर.एस. (मीठ साखर पाणी) द्रावणाचा वापर करावा.

दक्षता:- टॅब ॲस्परीन, ब्रुफेन ई औषधी देऊ नयेत. वैद्यकीय अधिकारी यांच्या देखेरेखीखाली औषधोपचार घेणे, रक्तस्त्रायुक्त डेंग्युताप (डेंग्यु हिमोरेजिक फिवर) व डेंग्यु शॉक सिंड्रोम या रुग्णांना तातडीने रुग्णालयात दाखल करणे आवश्यक आहे.

**प्रतिबंधात्मक उपाय योजना :-**

१. सर्व्हेक्षण :- किटकशास्त्रीय सर्व्हेक्षण करुन हाऊस इंडेक्स, कंटेनर इंडेक्स, ब्रॅटय इंडेक्स काढण्यात येऊन त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते. प्रत्यक्ष सर्व्हेक्षण अंतर्गत रक्त नमुन व रक्तजल नमुने घेऊन रुग्णांचा शोध घेऊन औषधोपचार करण्यांत येतो.

**२.डास अळी व डास नियंत्रण :-** डास अळी नियंत्रण ही सर्वात महत्वाची कृती आहे. हिवताप, डेंग्यु व चिकनगुनिया चे डास स्वच्छ पाण्यावर अंडी घालतात.

३. डासोत्पती स्थाने :- पावसाळ्यात साचलेली डबकी, रांजण, हौद, पाण्याच्या टाक्या, कुलर, रिकामे टायर, नारळाच्या करवंट्या इ.

४. डासोत्पती स्थाने नष्ट करण्यासाठी आठवड्यातून एकादा पाणी साठे रिकामे करुन कोरडा दिवस पाळण्यात यावा.

५. साचलेली डबके व नालया वाहत्या कराव्यात. खड्डे बुजविण्यांत यावेत. शक्य नसल्यास या पाण्यावर आठवड्यातून एकदा रॉकेल, टाकाऊ ऑईल टाकण्यात यावे.

६. ॲबेटीग :- आरोग्य विभागामार्फत घरातील सांड पाण्याचे रिकामे न करता येणारे पाणीसाठ्यात योग्य प्रमाणात ॲबेटीग केले जाते.

७. मच्छरदाणीचा वापर करण्यात यावा.

८. जैविक उपाय योजना :- डासोत्पत्ती स्थानात गप्पीमासे सोडण्यात येतात. हे मासे डासांच्या अळ्या खातात. सर्व आरोग्य संस्थेत गप्पी मासे मोफत मिळतात.

९. धुर फवारणी :- उद्रेकग्रस्त भागात धुर फवारणी केली जाते. आठवड्याच्या अंतराने दोनदा केली जाते.

# गुरु पौर्णिमा

ध्यानमूलं गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरोः पदमब।
मंत्रमूलं गुरोर्वाक्यं मोक्षमूलं गुरोःकृपा।।
गुरूरादिरनादिश्च गुरूः परम दैवतमब।
गुरोः परतंर नास्ति तस्मै श्री गुरवे नमः।।
सप्तसागरपर्यन्तं तीर्थस्नानादिकं फलमब।
गुरोरडिघ्रपयोबिन्दुसहस्त्रांशेन दुर्लभमब।।
हरौ रूष्टे गुरस्त्राता गुरौ रूष्टे न कश्चन।
तस्मातब सर्व प्रयन्तेन श्रीगुरूं शरणं व्रजेत।।
गुरूरेव जगत्सर्वं ब्रह्म विष्णुशिवात्मकमब।
गुरोः परतरं नास्ति तस्मात्संपूजयेद्गुरूम।।

आषाढ शुद्ध पौर्णिमेला म्हणजे या तिथीला आपण गुरुपौर्णिमा म्हणून गौरवितो.

आषाढ शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा म्हणतात. ज्यांनी महाभारत, पुराणे लिहिली त्या व्यासमुनींना वंदन करण्याचा, त्यांची पूजा करण्याचा हा मंगलदिन आहे. त्यांच्याएवढे श्रेष्ठ गुरुजी, आचार्य अद्याप झालेले नाहीत, अशी आपली श्रद्धा आहे. अशा या आचार्यांना साक्षात देवाप्रमाणे मानावे असे शास्त्रात कथन केले आहे. एवढेच नव्हे तर महर्षी व्यास हे भारतीय संस्कृतीचे शिल्पकार आणि मूलाधार मानले जात. ज्या ग्रंथात धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहारशास्त्र, मानसशास्त्र आहे, असा सर्वश्रेष्ठ ग्रंथ त्यांनी लिहिला. ज्ञानियांचा राजा म्हणून ज्याला मानतात, त्या ज्ञानदेवांनीसुध्दा ज्ञानेश्वरी लिहिताना 'व्यासांचा मागोवा घेतू' असे म्हणून सुरुवात केली.

व्यासपौर्णिमेच्या दिवशी 'ओम नमोस्तुते व्यास, विशाल बुद्धे' अशी प्रार्थना करून, त्यांना प्रथम वंदन करण्याचा प्रघात आहे, परंपरा आहे. आपल्या देशात रामायण-महाभारत काळापासून गुरु-शिष्य परंपरा चालत आली आहे. आपण ज्यांच्याकडून विद्या प्राप्त करतो, मिळवतो, त्याच विद्येच्या बळावर आपण सर्वांचा उद्धार करीत असतो. अशा या गुरूंना मान देणे, आदराने कृतज्ञता व्यक्त करणे हे आपले आद्य कर्तव्य होय. महर्षी व्यासांपासून अशी प्रथा रूढ झाली, ती आजमितीपर्यंत.

दत्तभक्तांसाठी हा पूण्यपावन दिवस ! या दिवशी शिष्य आपल्या गुरुची पंचोपचारे पूजा करतो. आपल्याला मिळालेल्या कृपादानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो आणि पूढील वाटचालीसाठी आशिर्वाद घेतो. वेगवेगळ्या पंथ व संप्रदाय हा इश्वरभक्तीकडे जाणारे मार्ग शोधणारे मुमुक्षु - पारमार्थिक या दिवशी भक्तीभावाने गुरुंचे पूजन करतात व गुरुदक्षिणा देऊन कृतज्ञता व्यक्त करतात.

खरं गुरुपूजन, खरी गुरुपूजा म्हणजे गुरुंनी आपल्याला जे ज्ञान दिले आहे, जो बोध केला आहे, जी शिकवण दिली आहे त्याचे प्रत्यक्ष आचरण करणे. सदगुरुंनी दाखवून दिलेल्या साधना मार्गाचा अभ्यास करणे, त्यांचा शब्द चालवणे म्हणजे खरे गुरुपूजन !

गुरूंच्या उपकारांनी आपले मन कृतज्ञतेने भरून येते, तेव्हा आपल्या तोंडून श्लोक बाहेर पडतो -

**गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरु साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः।।**

आषाढ शुद्ध पौर्णिमा हा दिवस 'गुरुपौर्णिमा' म्हणून स्वीकारला आहे. त्यानिमित्त महर्षी व्यासांनी वेदाचे चार भाग, सहा शास्त्रे, अठरा पुराणांच्या रचना करून मानवी जीवनाला संपन्न केले आहे. या सर्वांतून भगवंताचे गुणगान, त्यांचे यशगान करीत मनुष्याला जीवन जगण्याचे मार्गदर्शन केले आहे. या अमोलिक कार्याची कृतज्ञता म्हणून भारतीय पूर्वसुरींनी व्यासांचे पूजन या दिनी केल्यामुळे या दिवसाला 'व्यास पौर्णिमा' अथवा ''गुरुपौर्णिमा' असे म्हणतात. गुरु दोन प्रकारचे असतात एक गुरु ! एक सदगुरु ! अवधूतांनी यदुराजाला उपदेश करताना सांगितले की -

**जो जो जयाचा घेतला गुण ।**
**तो म्यां गुरु केला जाण ।**

गुरुसी पडले अपारपण । जग संपूर्ण गुरु दिसे असे सांगून अवधूतांनी २४ गुरु केले. या चोविसांचे महत्व तीन प्रकारांत आहे. एक सदगुण अंगीकारासाठी गुरू, दोन अवगुण त्यागासाठी गुरु आणि तीन ज्ञानप्राप्तीसाठी गुरु. म्हणजे 'गुरु' हे लौकिक दृष्टीने जे मार्गदर्शन करतात ते या विभागात येतील.

ज्यांनी आत्मनात्मविवेक सांगून मायेच्या संसाररूपी पुरातून मला वाचविले तो सद्गुरु अखंड माझ्या ह्र्दयात आहे, म्हणूनच माझे या विवेकावर प्रेम आहे. आदर आहे. ज्याप्रमाणे डोळ्यांत अंजन घातले असता दृष्टीचे तेज वाढते त्या दृष्टीने भूमिगत धन दिसू लागते. (दडलेले ज्ञान स्पष्ट दिसू लागणे.) ज्याप्रमाणे हाती चिंताम णी लागल्यास मनुष्याचे सदासर्वदा मनोरथ पूर्ण होतात.

'गुरुचरित्र' या ग्रंथात श्री गुरुंच्या लीलांचे वर्णन असले तरी गुरुंच्या ध्यानाचे, सेवेचे, भावाचे, पूजनाचे महत्व सांगितले आहे. कलीने ब्रह्मदेवांना 'गुरु' शब्दाचा अर्थ विचारला तेव्हा ब्रह्मदेवांनी सांगितला, की 'ग' कार म्हणजे सिध्द होय. 'र' कार म्हणजे पापाचे दहन करणारा. 'उ' कार म्हणजे विष्णूंचे अव्यक्त रूप. तसेच गुरु हाच ब्रह्मा, विष्णू, महेश. हे त्याचे त्रिगुणात्मक रूप आहे. या पलीकडे जे परब्रह्म तत्व आहे ते जाणण्यासाठी गुरुंचा आश्रय घ्यावा लागतो. ईश्वर जरी प्रसन्न झाला तरी त्याला ओळखणारा गुरुच असतो व गुरु स्वत: प्रसन्न झाला तर ईश्वर आपल्या अधीन होतो.

आपण कोणाचे तरी शिष्य आहोत, या भावनेत एक कृतज्ञता वाटते. भारतीय गुरुपरंपरेत गुरु-शिष्यांच्या जोड्या प्रसिद्ध आहेत. जनक-याज्ञवल्क्य, शुक्राचार्य-जनक, कृष्ण, सुदामा-सांदिपनी, विश्वामित्र-राम, लक्ष्मण, परशुराम-कर्ण, द्रोणाचार्य-अर्जुन अशी गुरु-शिष्य परंपरा आहे. मात्र एकलव्याची गुरुनिष्ठा पाहिली की, सर्वांचेच मस्तक नम्र झाल्याशिवाय राहत नाही.

भगवान श्रीकृष्णांनी गुरूच्या घरी लाकडे वाहिली. संत ज्ञानेश्वरांनी वडीलबंधू निवृत्तीनाथ यांनाच आपले गुरु मानले, तर संत नामदेव साक्षात विठ्ठलाशी भाष्य करीत असत. त्या नाम देवांचे गुरु होते विसोबा खेचर. भारतीय संस्कृतीत गुरूला नेहमीच पूजनीय मानले आहे.

गुरुपौर्णिमा ही सद्गुरूंची पौर्णिमा मानली जाते. पौर्णिमा म्हणजे प्रकाश. गुरु शिष्याला ज्ञान देतात. तो ज्ञानाचा प्रकाश आपल्यापर्यंत पोहोचावा, म्हणून गुरूची प्रार्थना करावयाची, तो हा दिवस होय.

गुरु म्हणजे ज्ञानाचा सागर आहे. जलाशयात पाणी विपुल आहे, परंतु घटाने-घागरीने आपली मान खाली केल्याशिवाय म्हणजे विनम्र झाल्याशिवाय पाणी मिळू शकत नाही. त्याप्रमाणे गुरूजवळ शिष्याने नम्र झाल्याविना त्याला ज्ञान प्राप्त होणार नाही, हे सर्वांनी लक्षात ठेवावे. 'गुरु बिन ज्ञान कहासे लावू?' हेच खरे आहे.

गुरु म्हणजे गुह्य रूप

गुरू-अज्ञानाचा अंधकार नाहीसा करून ज्ञानाच्या, प्रकाशाच्या वाटेकडे घेऊन जातात ते!

आपल्या जीवनात गुरुंना जेवढे महत्त्व आहे तेवढेच किंबहुना त्यापेक्षा जास्त महत्त्व सदगुरुंना आहे. सर्व मानवजातीला पारमार्थिक, आध्यात्मि क उन्नतीचा मार्ग दाखवणारे, भक्ताला, साधकाला मोक्षाप्रत नेणारे सदगुरु, त्यांच्या स्मरणासाठी, त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'गुरुपौर्णिमा' (आषाढ पौर्णिमा) हा पर्वकाल सांगितला आहे. सुप्रसिध्द गुरु-शिष्यांच्या जोड्या आपणा सर्वांना परिचित आहेत.

'गुरुबिन कौन बतायें 'बाँट ।' हा मायारूपी भवसागर तरून जायचे असेल तर सदगुरुंची आवश्यकता आहे. सदगुरुच आपल्याला मोक्षाप्रत नेतात. एकदा त्यांना आपला हात हातात घेतला की ते आपल्याला सोडत नाहीत. सदगुरुंना शोधण्यासाठी आपणांस जावे लागते असे नाही, तर शिष्याची आध्यात्मिक तयारी झाली की, ते स्वत:हूनही त्याला शोधत येतात. आपल्या पूर्व प्रारब्धकर्मानुसार आपल्याला सदगुरु भेटतात. सदगुरुंकडून एकदा का अनुग्रह घेतला की, त्याचे स्मरण अहोरात्र करावयाचे असते. जशी प्रतिव्रता स्त्री तिच्या पतीचे स्मरण करते; त्याप्रमाणे सदगुरुंनी दिलेल्या नामात खूप मोठी शक्ती आहे. नामधारकाच्या मागे-पुढे उभे राहून ते नाम त्यांच्याकडून पूर्ण करून घेतात. तसेच त्यांची त्यात सत्ता पण असते. सदगुरुच सर्व काही करवून घेत असल्यामुळे नामधारकाच्या 'मी' ला कुठेही वाव नसतो. सदगुरुंकडून अनुग्रह घेतला की दुसऱ्या कोणत्याही संतांकडून अनुग्रह घेऊ नये अशी संकल्पना आहे. त्यांच्याशी एकनिष्ठेने राहावे. एक गुरु, एक नाम असावे. त्यांनी दिलेल्या नामात भगवंताचे प्रेम असते.

सदगुरुंची प्राप्ती झाल्यानंतर 'गुरुसेवा' करणे हे शिष्याचे परमकर्तव्य आहे. गुरुसेवा म्हणजे त्यांची आज्ञा पाळणे. मनात कोणताही किंतू न ठेवता, विकल्प येऊ न देता त्यांनी सांगितलेली साधना नित्यनियमाने प्रेमाने करावी. तसेच साधकाची संपूर्ण शरणागती असावी. शरण जाणे म्हणजे १) सदगुरु ठेवतील त्या अवस्थेत समाधानात राहणे. २) त्यांच्या इच्छेत आपली इच्छा मिसळणे. ३) कोणत्याही परिस्थितीत नाम घेण्याचे सोडू नये. ४) नामावर, सदगुरूवर पूर्ण विश्वास, श्रद्धा ठेवणे. त्यांनी सांगितलेले साधन न करता इतर साधन केल्यास वृथा कष्टच होतील आणि पदरात काही पडणार नाही. सदगुरुंना जे शरण जातात त्यांचा कार्यभार सदगुरु उचलतात. त्यांच्या मागे-पुढे उभे राहून ते सत्तारूपाने त्यांना मदत करतात. सदगुरु नावाड्याचे काम करतात. आपली जीवनरूपी नौका योग्य दिशेला घेऊन जातात.

भगवंताच्या आशीर्वादानेच आपली सदगुरुंशी भेट होते व सदगुरुंकडे नाम मिळाल्यानंतरच ईश्वराच्या व्यापक स्वरूपाची महती कळते.

सदगुरुंचे 'अनुसंधान' राखणे महत्त्वाचे. कोणतेही प्रापंचिक काम करत असताना सदगुरुंवर मन एकाग्र करणे यालाच अनुसंधान असे म्हणतात. सदगुरुंना दृष्टीआड होऊ न देणे म्हणजेच अनुसंधान. अनुसंधान ठेवण्यासाठी त्यांनी दिलेले नाम नियमितपणे घेणे. प्रपंच करताना आपले लक्ष मात्र सदगुरूंच्या चरणी असावे. ते म्हणजेच अनुसंधान.

गुरु कोणाला करावे ? जिथे आपले समाधान होते, संशय, शंका फिटतात तेच गुरुपद म्हणावे. गुरुपद, गुरुतत्व सर्व ठिकाणी एकच असते म्हणूनच -

**ज्या ज्या ठिकाणी मन जाय माझे ।**
**त्या त्या ठिकाणी निजरूप तुझे ।**
**मी ठेविते मस्तक ज्या ठिकाणी । तेथे**
**तुझे सदगुरु पाय दोन्ही ।।**

गुरुतत्व एकच असल्यामुळे सर्व सदगुरुंमध्ये आपले सदगुरु आपल्याला पाहता आले पाहिजे. हे सद्गुरु साधकाला समाधानात ठेवून संकटे सहन करण्याची शक्ती देतात. साधकाच्या प्रारब्धात यत्किंचितही बदल, फेरफार करत नाही. परंतु तो भोग सोयीने (सहजतेने) भोगण्याची तरतूद मात्र निश्चितपणे करतात. भोगाची तीव्रता कमी करतात. भोग भोगताना जी मदत आवश्यक असेल त्याबद्दल मार्गदर्शन करतात. (उदा. पैशाची सोय, मनुष्यबळ, हवी ती व्यक्ती भेटणे.)


आपल्याला जर आध्यात्मिक ज्ञान मिळावे असे वाटत असेल तर सदभावाने सदगुरु चरणाची सेवा करावी. जिथे गुरुक्षेत्र आहे तिथेच मोक्श देणारी काशी, पंढरपूर आहे हे ध्यानात घ्यावे. सर्व तिर्थे तिथे लोळण घेत असतात. देवांचे देव सुद्धा तिथे वस्तीस आलेले असतात. सदगुरुंचा महिमा अपार आहे. तो ऋषींनाही वर्णन करता आला नाही. त्यांची लीला अगाध आहे. तिथे मुकेही बोलतात, लुळे काम करतात, पांगळे पर्वत चढून जातात. सदगुरु म्हणजे वैराग्याचे मंदिर, शांतीसुखाचे माहेर, शमदमन केलेले, भक्तिज्ञानाची पेठ, शुध्दभाव इ. गोष्टी त्यांचे ठायी असतात.

# ‘ज्ञानोबा माऊली तुकाराम‘, ‘पुंडलिक वरदा हरी विठ्ठल‘ या जयघोषाने दुमदुमलेले वातावरण,







आषाढी एकादशी निमित्त ना.श्री.अतुल सावे मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ’वारी पंढरीची ज्ञानगंगा संभाजीनगरची’ या सोहळ्यात सहभाग घेतला.. यावेळी हजारो भाविकांसाठी महाप्रसादाचे तसेच दिंडीसाठी रिंगण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.. ‘ज्ञानोबा माऊली तुकाराम‘, ‘पुंडलिक वरदा हरी विठ्ठल‘ या जयघोषाने दुमदुमलेले वातावरण, टाळक मृदुंगाचा गजर आणि हरिनामात तल्लीन झालेले भाविक हे वातावरण नेहमीच निराळी ऊर्जा देणारे ठरते..वारकरी म्हणजे पांडुरंगाचेच स्वरूप या वारकऱ्यांच्या सेवेसाठी महाप्रसादाचे आयोजन या निमित्ताने करण्यात आले, त्यांची थोडीशी सेवा पांडुरंगाने घडवून घेतली याचे समाधान आहे..









# ‘जय जगन्नाथ’च्या जयघोषांनी भक्तिमय वातावरणात भगवान श्री जगन्नाथ रथयात्रेचा समारोप







प्रतिवर्षीप्रमाणे एन-७, सिडको येथे यंदाही भक्तिभावाने आणि उत्साहात भगवान श्री जगन्नाथ रथयात्रेचे भव्य आयोजन ९ दिवस विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. रथामध्ये विराजमान झालेल्या भगवान श्रीजगन्नाथाचे दर्शन घेण्यासाठी भक्तांनी मोठी गर्दी केली होती.. मिरवणुकीदरम्यान संपूर्ण परिसर ’जय जगन्नाथ’च्या जयघोषांनी भक्तिमय झाला होता. ६ रोजी रथयात्रेचा समारोप करण्यात आला.

# बुरशीयुक्त भगर खाल्ल्यास होईल अन्न विषबाधा, सतर्कतेचे आवाहन; विक्रेत्यांची होणार तपासणी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

उपवासाला फराळ म्हणून खाल्ल्या जाणाऱ्या भगरीला जर बुरशीचा प्रादुर्भाव झाला असेल तर अन्नविषबाधा होऊ शकते. त्यासाठी प्रशासनाने ग्राहकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून बुरशीचा प्रादुर्भाव झालेली भगर विक्री करतांना आढळल्यास संबंधित विक्रेत्यांविरुद्ध कारवाई करण्यात येईल असेही निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण फुलारी यांनी कळिवले आहे.

**बुरशीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता**

भगरीवर मोठ्या प्रमाणात अस्परगिलस (ओीशिीसळश्रश्री) प्रजातीच्या बूरशीचा प्रादुर्भाव होतो. ज्यामुळे फ्युमिगाक्लेविन (ऋीोळसरलश्रर्ींळपश) यासारखी विषद्रव्ये (ढेळपी) तयार होतात. पावसाळ्यातील वातावरण बूरशीच्या वाढीसाठी अनूकूल असते. अशी बूरशीचा प्रादुर्भाव झालेली भगर खाण्यात आल्यास अन्न विषबाधा होऊ शकते.

**भगर खाण्यापूर्वी व खातांना काळजी घ्या**

बाजारातून भगर आणल्यानंतर ती निवडून स्वच्छ करा. शक्यतो पाकीटबंद भगर घ्या. ब्रँड नाव नसलेली किंवा लेबल नसलेली भगर पाकिटे व सूटी भगर घेऊ नका. भगर घेतांना पाकीटवरचा पॅकींग दिनांक व अंतिम वापर दिनांक तपासा. भगर साठवताना ती स्वच्छ कोरड्या ठिकाणी, व्यवस्थित झाकणबंद डब्यात ठेवा.जेणकरुन वातावरणातील ओलाव्यामुळे बूरशीची वाढ होणार नाही. जास्त दिवस भगर साठवू नका. तसेच जास्त दिवस साठवलेली भगर खाऊ नका. शक्यतो भगरीचे पीठ विकत आणू नका. भगरीच्या पिठामध्ये वातावरणातील ओलावा शोषून घेण्याची क्षमता अधिक असते. त्यामुळे पिठाला बुरशीची लागण होण्याची शक्यता जास्त असते. भगरीच्या दशम्या किंवा भाकरी खाण्याऐवजी खिचडी खावी.भगरीचे पीठ आवश्यक असेल तेवढेच दळून घ्या. जास्त दिवस पीठ साठवू नका. बाहेरुन दळून आणण्यापेक्षा घरीच दळा.भगर आणि शेंगदाणे हे अधिक प्रथिनेयुक्त पदार्थ आहेत. दोन ते तीन दिवस सलग उपवास असताना या पदार्थाचे सेवन ॲसिडीटी वाढण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे उलटी, मळमळ व पोटाचे त्रास होतात. या पदार्थाचे सेवन पचनशक्तीनुसार मर्यादितच करावे.

**भगर विक्रेत्यांसाठी सूचना**

विक्रेत्यांनी पॅकबंद भगरचीच विक्री करावी तथापि भगर खरेदी करतांना घाऊक विक्रेत्याकडून पावती घ्यावी.भगरीचे पॅकेट, पोत्यावर उत्पादकांचा पत्ता परवाना क्र. पॅकींग दिनांक, अंतिम वापर दिनांक असल्याची खात्री करुन घ्या.मुदबाह्य भगर किंवा भगर पिठाची विक्री करु नये. सुटी भगर व खुले भगर पीठ शक्यतो विक्रीसाठी ठेऊ नये.

**भगर विक्रेत्यांच्या दुकानांची होणार तपासणी**

भेसळयुक्त भगर विक्री टाळण्यासाठी अन्न औषध प्रशासनाचे वतीने भगरविक्री करणाऱ्या दुकानाची तपासणी करण्यात येणार आहे. भेसळयुक्त, बुरशीयुक्त भगर विक्री करणाऱ्या वा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या विक्रेत्या।वर अन्न सुरक्षा व मानके अधिनियम - २००६ अंतर्गत कारवाई करण्यात येईल,असा इशारा निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण फुलारी यांनी दिला आहे.

# भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज मागविले

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविते, शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील प्रवेशित व भारत सरकार शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती व इतर ऑनलाईन योजनेसाठी पात्र असलेल्या अनु.जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्यासाठी महाडिबीटी प्रणाली दि.३० जून पासुन सुरु झाली आहे.

तरी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सर्व शासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कनिष्ठ, वरिष्ठ, व्यावसायिक, बिगर व्यावसायिक, महाविद्यालयातील प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील प्रवेशित सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज भरुन घेण्याची कार्यवाही करावी, असे आवाहन छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे सहायक आयुक्त, सम ाजकल्याण आर.एम.शिंदे यांनी केले आहे.

# श्रुगेश्वर महादेव मंदिर, पिंपळखुटा येथे अनुराधाताई चव्हाण यांच्या आमदार निधीतून शेड कामाचे भूमिपूजन



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

आषाढी एकादशीच्या पावन दिनी श्री श्रुगेश्वर महादेव मंदिर, पिंपळखुटा, ता.छत्रपती संभाजीनगर येथे आमदार अनुराधाताई चव्हाण यांच्या आमदार निधीतून १५ लक्ष रकमेच्या शेड कामाचे भूमिपूजन संपन्न झाले.

यावेळी महंत श्री.पंडित स्वामी, ज्येष्ठ नेते श्री.सजन नाना मते, छ.संभाजीनगर बाजार समितीचे संचालक श्री.दत्ता भाऊ उकिर्डे, करमाड मंडळ अध्यक्ष श्री.सुदाम ठोंबरे, लाडसावंगी मंडळ अध्यक्ष श्री.शिवाजी वाघ, श्री.सजन बागल, सरपंच दुर्गाताई बहुरे, उपसरपंच श्री.तुकाराम पडुळ, श्री.रामकिसन भोसले, श्री.रमेश शिंदे, श्री.विजय काळे, श्री.रविंद्र पडुळ, श्री.सुदाम पवार, श्री.दौलत शेजुळ, श्री.सोमिनाथ घाईट, श्री.भेरे नाना, श्री.संजय पचलोरे, श्री.ऋषी नरवडे, श्री.अमोल पवार, श्री.विजय खरपे, श्री.संजय भालेराव, श्री.बद्री दाभाडे, श्री.पांडुरंग भाऊ दाभाडे, खरेदी-विक्री संघाचे नवनियुक्त संचालक आणि अनेक भाविक उपस्थित होते.

# नळिवहिरा येथे ‘ॲग्रोव्हिजन’ आयोजित ‘कृविकें’चे सघन कापूस लागवड चर्चासत्र संपन्न

जाफराबाद तालुक्यातील नळिवहिरा येथे हनुमान मंदिरावर ( ५ जून ) गुरुवार रोजी ॲग्रोव्हिजन गटशेती संघ व नल ॲग्रोव्हिजन फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमिटेड यांच्या वतीने आयोजित शासकीय अनुदानास पात्र अशा विशेष कापूस प्रकल्प २०२५ - २०२६ योजनेतून सघन व दादा लाड कापूस लागवड तंत्रज्ञान बाबत शेतकरी मार्गदर्शन व चर्चासत्र संपन्न झाले.



बदनापूरच्या कृषी विज्ञान केंद्रातील श्री. अजित डाके यांनी या विशेष कापूस योजना प्रकल्पबाबत शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. बियाणे, लागवडीचे अंतर, छाटणी किंवा वाढरोधक तंत्रज्ञान, खताच्या मात्रा, मिळणारे शासकीय अनुदान व एकूण मिळणाऱ्या नफ्याची त्यांनी गोळाबेरीज सांगून हे तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी कसे फायद्याचे आहे हे उपस्थित शेतकऱ्यांना पटवून दिले.

ॲग्रोव्हिजन गटशेती संघ व नल ॲग्रोव्हिजन फार्मर प्रोड्युसर कंपनीचे संस्थापक प्रमुख श्री. संजय मोरे पाटील यांनी कापूस पिकासह गटाने सोयाबीन पिकाचा पेरा केल्यास मिळणारे फायदे सांगून उपस्थितांचे आभार मानले. यावेळी सर्वश्री रावसाहेब गाडेकर, विष्णू मोरे, ज्ञानेश्वर गाडेकर, आनंता लोखंडे, सूर्यभान गाडेकर, राजेंद्र क्षीरसागर, गुलाबराव म्हस्के, दिनेश गायकवाड, आंबादास गाडेकर, गजानन दानवे यासह शेतकरी उपस्थित होते.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199

## मुख्यमंत्र्यांनी घेतली दखल !

# ५०० युनिटपर्यंत मोफत वीज मागणी प्रस्ताव मुख्यमंत्र्यांनी पाठवला उर्जा विभागाकडे- राजेंद्र दाते पाटील

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

नुकतेच राज्य शासनाने विविध हवाले देत वीज दराची 'चतुर ' पद्धतीने मांडणी करून स्वतःचे मोठे पण दाखवण्याचा प्रयत्न केला असता यावर तात्काळ ५०० युनिट पर्यंत वीज मोफत करावी व टी ओ डी मीटर राज्यभरात रद्द करून न्याय द्यावा अशी जोरदार जनहिताची मागणी शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील मुख्यमंत्र्या कडे केली असता या मागणीची गांभीर्याने दखल घेत हा प्रस्ताव उर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला यांचे कडे पुढील कारवाई साठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाठवला आहे.

आपल्या निवेदनात त्यांनी नमुद केले होते की, अगदी सुरुवाती पासुनच स्मार्ट मीटर, टीओडी मीटर बसवण्याच्या प्रक्रिया साठी संपुर्ण महाराष्ट्र विरोध करीत असुन कमी वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना पहिल्या वर्षी १० टक्के सवलत, स्मार्ट मीटर वापरणाऱ्यांना दिवसा वीज वापरावर अतिरिक्त १० टक्के टीओडी लावण्याचे धोरण नागरिकांना वेठीस धरणारे ठरणार असल्याचे त्यांनी नमुद करून हा प्रश्न उपस्थित केला की,जर का हरित ऊर्जा खरेदी तून आगामी ५ वर्षांत वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असतील तर वीजदरात ५०० युनिट पर्यंत सामाईक (युनिफॉर्म) उपाय योजना का केल्या जात नाही ? असा परखड सवाल उपस्थित करून १०० पासुन ३०० युनिट पर्यंत फक्त सहा पैशांची सवलत याला कशाचे द्योतक म्हणावे ?असा जळजळीत सवाल देखील डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला होता.राज्यात पहिल्यांदाच घरगुती,औद्योगिक, व्यावसायिक वीजदर पहिल्या वर्षी १० टक्के आणि पाच वर्षांत २६ टक्के कमी होणार आहेत.महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने(एमईआर सी) महावितरणच्या याचिकेवर दिलेल्या आदेशा मुळे सध्या असलेले १०१ ते ३०० १३.२३ रुपये २०२५- २०२६ मध्ये १३.१७ होतील तर सध्याचे ३०१ ते ५०० युनिट १७.७८ एवढी असून ती २०२५- २०२६वर्षात १७.५६ एवढी होणार तर ५०० युनिट च्या पुढील सध्या १९.२३ रुपये तर वर्ष २०२५- २०२६ या वर्षात १९.१५ म्हणजे फक्त आठ पैशांचा फरक असणार आहे आणि हीच बाब शासनाची काय दृष्टी आहे हे अभिप्रेत करणारी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. आयोगाच्या या आदेशाचा लाभ घरगुती वापर करणाऱ्या १०० युनिटच लक्षात घेत

**विषय:- ५०० युनिट पर्यंत विद्युत पुरवठा मोफत देऊन टी ओ डी मीटर रद्द करणे बाबत**

From Shri. Devendra Fadnavis (Chief Minister) <CM@maharashtra.gov.in>
Date Wed, 02 Jul 2025 18:02:47
To Abha Shukla <psec.energy@maharashtra.gov.in>
Cc "dateypatil1969@rediffmail.com" <dateypatil1969@rediffmail.com>




औद्योगिक आणि व्यावसायिक ग्राहकांना हा लाभ होताना भरीव फायदा थेट दिसतच नाही. आगामी पाच वर्षांत जर का महावितरणचे वीज खरेदीचे ६६ हजार कोटी रुपये वाचणार असतील तर त्याचा फायदा सर्वच ग्राहकांना भरीव स्तरावर का नाही ? हा महत्वाचा सवाल डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी उपस्थित केला होता व नमुद केले होते की, सन २०३० पर्यंत राज्याचीविजेची क्षमता ८१ हजार मेगावॅट होण्यासाठी ४५ हजार मेगावॅटचे वीज खरेदीचे करार केले.त्यापैकी २ हजार मेगावॅट वीज रिन्युएबल अर्थात नवीकरणीय ऊर्जा स्रोतांमधून मिळणार आहे असे असेल आणि ती अत्यंत किफायतशीर दरात मिळणार असल्यास पाच वर्षांत ६६ हजार कोटी रुपये वाचण्याच्या दाव्याचा फायदा सर्व सामान्य विद्युत ग्राहकांना का नाही ? असे ही त्यांनी नमुद करून महावितरणने मुंबईतील काही भागात तर अदानी व टोरेंट या खासगी वीजकंपन्यांनी एकमेकांच्या परवाना क्षेत्रात वितरण परवाना मिळिवण्या साठी आयोगापुढे याचिका सादर केल्या आहेत त्या काही जनहिता साठी अजिबात नाही.

पुढे डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी अत्यंत मुद्देसुद निवेदन केले. महावितरणने ४८ हजार कोटी रुपयांची तूट येणार असल्याने वित्तीय ताळेबंदातून आयोगापुढे मांडण्यात आले होते व त्या नुसार महसूल वाढ देण्याची मागणी महावितरणने केली होती हे कशाच्या बळावर मांडले होते हा देखील अनुत्तरित आहे.

राज्य शासनाने अधिक जनहिताच्या बाबीवर विचार करून सर्वसामान्य ग्राहकांच्या हितासाठी ५०० युनिट पर्यंत वीज पुरवठा मोफत करण्याची भुमिका घ्यावी आणि एकंदरीत या निकालाचा अधिकचा व्यापक विचार करून सामान्य गोरगरीब आणि शेतकरी यांच्या उत्पन्नाचा अधिक बारकाईने विचार करून पुनर्विचार करावा आणि टी ओ डी मीटर लावण्याची प्रकिया रद्द करून ५०० युनिट पर्यंतचे विद्युत पुरवठा कायम स्वरुपी मोफत करावाअशी जोरदार मागणी शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉज चे सचिव डॉ राजेंद्र दाते पाटील यांनी केली असता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सदरची बाब पुढील कारवाई साठी या मागणीची गांभीर्याने दखल घेत हा प्रस्ताव उर्जा विभागाच्या प्रधान सचिव श्रीमती आभा शुक्ला यांचे कडे पाठवुन न्याय देण्याचे कार्य हाती घेतले असल्याचे दिसुन येत असून तसेच खाजगी कंपन्यांना परवान्यामुळे मनमानी वाढेल म्हणून या कंपन्यांना वीज वितरणाचा परवाना मंजूर झाल्यास शासनाच्या महावितरण कंपनीस दुय्यम स्थान प्राप्त होईल आणि खाजगी कंपन्यांची मनमानी वाढुन कालांतराने प्रचंड वीज बीलवाढ होऊन सर्वसामान्य लोकांना आर्थिक भुर्दंड वाढणार आहे ही अत्यंत अभ्यासू बाब त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्षात आणुन देत नमुद केले होते की, विद्युत निर्मिती जरी खाजगी कंपन्यांनी केली तरी वितरण व्यवस्था फक्त आणि फक्त महावितरण कंपनी कडेच असावी त्या स्थितीत कोणाची वीज घ्यायची किंवा कुठल्या कंपनीचे वीज मीटर घ्यायचे ही सक्ती वाढेल म्हणुन जनहितार्थ हा होऊ घातलेला निर्णय शासनाने तत्काळ अमान्य करून रद्द करावा अशीही मागणी राज्याच्या मुख्यमंत्र्यां कडे शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक व पीपल्स फोरम फॉर सोशल कॉजचे सचिव डॉ. राजेंद्र दाते पाटील यांनी केली असता विषयाचे गांभीर्य त्यांनी लक्षात घेतल्याचे स्पष्ट होत आहे. या बाबत त्यांना मुख्यमंत्र्यांचा मेल प्राप्त झाला असल्याची बाब महत्वाची ठरत आहे.

# आषाढी एकादशी निमित्त पळसवाडीत भक्तिमय दिंडी



**खुलताबाद**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील पळसवाडी येथे आषाढी एकादशीनिमित्त नाथ मा.विद्यालय आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने भक्तिभावाने ओतप्रोत अशी दिंडी मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत विद्यार्थ्यांनी विठ्ठल- रुखमाई वेशभूषा परिधान करून, विविध संतांच्या वेशभूषा व पालख्या साकारत, टाळ मृदंगांच्या गजरात पावलं टाकली.दिंडीत भजने, अभंग, फुगडी, पाऊली खेळत विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. यामुळे संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणाने न्हालं.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सौ.विजया बनकर यांच्या हस्ते दिंडीचे पूजन करण्यात आले.त्यांनी मुलांचे तोंड गोड करत सर्वांना शुभेच्छा दिल्या. गावातील अनेक महिलांनी ही दिंडीचे पूजन करून आपला सहभाग नोंदवला.

नाथ मा. विद्यालयाच्या वतीने विशेष ग्रंथ दिंडी चे आयोजन ही करण्यात आले होते. दिंडीचा समारोप विठोबा-रखुमाई मंदिरात दर्शन घेऊन करण्यात आला.यावेळी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक मच्छिंद्र ठेगडे यांनी 'भारतीय संस्कृतीची महानता'या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी काळे सर,चांदणे सर,नागे मॅडम, शिंदे मॅडम, हरणे मॅडम, कुमावत मॅडम, सोनवणे मॅडम, कांबळे सर व इतर शिक्षकांनी विशेष परिश्रम घेतले. या अनोख्या उपक्रमामुळे पळसवाडी गावात अध्यात्मिक ऊर्जा व भक्तीभावाचा अनुभव सर्व ग्रामस्थांना मिळाला.

# बीड जिल्ह्यातील अल्पवयीन विद्यार्थिनीचा छळ : कायद्यात बदल हवा!

समाजातील काही गुन्हे असे असतात की त्यांच्याकडे केवळ कायद्याच्या अंध प्रक्रियेने पाहणे योग्य ठरत नाही. बीड जिल्ह्यातील अल्पवयीन विद्यार्थिनीवर घडलेला लैंगिक अत्याचार याच प्रकारातील एक गंभीर आणि संतापजनक घटना आहे. अशा प्रकरणांमध्ये केवळ कायद्याच्या किचकट प्रक्रियेचा आधार घेत बसणे, वेळकाढूपणा करणे आणि गुन्हेगारांना सवलती मिळू देणे समाजासाठी धोकादायक ठरते.

भारतीय संविधान, न्यायव्यवस्था आणि लोकशाही यांचा सन्मान केला पाहिजे, पण हा सन्मान गुन्हेगारांना वेळ मिळावा, पळवाटा मिळाव्यात आणि बचावाची संधी मिळावी यासाठी वापरला जाऊ नये. संविधान हा प्रामाणिक, कर्तव्यदर्शी, आणि जबाबदार नागरिकांसाठी आहे. गुन्हेगारांसाठी संविधानामध्ये अमर्याद स्वातंत्र्याची मुभा नाही.

समाजाच्या सुरक्षिततेसाठी न्याय प्रक्रियेला गती मिळावी. दोष सिद्ध होणाऱ्या प्रकरणांमध्ये तातडीने कठोर कारवाई झाली पाहिजे. सात दिवसांत तपास पूर्ण करणे, दोन दिवसांत प्रकरण न्यायालयात सादर करणे आणि दोष सिद्ध झाल्यास तातडीने कठोर शिक्षा करणे ही सामाजिक गरज आहे. वर्षानुवर्षे चालणारे खटले, वेळकाढूपणा, आणि गुन्हेगारांना दिल्या जाणाऱ्या कायदेशीर सवलती या सगळ्या गोष्टी गुन्हेगारांच्या बाजूने जातात, समाजाच्या नाहीत.

सरकार विविध निर्णय काही वेळा काही दिवसांत बदलते, नवीन कायदे आणते, योजनांमध्ये तातडीने सुधारणा करते. मग अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये मात्र सर्व नियमांचा अतिरेक का केला जातो? गुन्हेगारांना पळवाट मिळावी म्हणूनच का कायद्यातील प्रत्येक प्रक्रियेचा कडक आग्रह धरला जातो? हा प्रश्न कायमच उभा राहतो. इतिहासातील छत्रपती शिवाजी महाराजांचे उदाहरण समाजाला नेहमीच शिकवणारे ठरते. महाराजांनी रयतेच्या सुरक्षेसाठी वेळोवेळी कठोर निर्णय घेतले. नियम नसतानाही पाटलाचे हात कापण्याचा निर्णय घेतला. समाजहितासाठी कायद्यात किंवा नियमांमध्ये आवश्यक ते बदल करण्याची परंपरा त्यांच्यापासून सुरु झाली.

समाजाच्या सुरक्षिततेसाठी कधी कधी नियमांपेक्षा मोठा विचार करणे आवश्यक असते. सध्या कायद्यात जलद कारवाईची तरतूद नसल्यास कायद्यात तातडीने बदल करणे ही काळाची गरज आहे. जलदगती न्याय, कठोर कारवाई आणि दोष सिद्ध झाल्यास तातडीने शिक्षा देणे ही समाजाची नैतिक आणि कायदेशीर गरज आहे. गुन्हेगारांना कायद्याच्या प्रक्रियेतून मिळणाऱ्या सवलती, वेळ मिळवण्याचे मार्ग, राजकीय हस्तक्षेप आणि सामाजिक प्रभाव यांच्या आड समाजाची सुरक्षा आणि मुलींची प्रतिष्ठा गमावली जाऊ नये.

गुन्हेगार कायद्याच्या प्रक्रिया वापरून वेळ खेचतात, साक्षीदारांवर दबाव टाकतात, आणि वर्षानुवर्षे निकाल लांबवतात. अशा पद्धतीने न्याय न मिळणे हे समाजाच्या मुळावर उठणारे आहे. समाजाचा संताप आणि आक्रोश केवळ भावनिक नाही, तो एक ठाम सामाजिक संदेश आहे. न्यायव्यवस्था समाजासाठी आहे, समाज न्यायव्यवस्थेसाठी नाही. न्याय वेळेवर मिळालाच पाहिजे. उशीराने मिळणारा न्याय हे देखील अन्यायच ठरतो.

अशा प्रकरणांमध्ये न्याय मिळण्याचा अर्थ केवळ शिक्षा देणे नाही, तर संपूर्ण समाजाला, भावी गुन्हेगारांना, पालकांना, आणि मुलींना एक स्पष्ट संदेश देणे आवश्यक आहे - की अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये कोणतीही माफी नाही, कोणतीही सवलत नाही आणि कोणतीही विलंबित कारवाई नाही. कायद्याच्या नावाखाली अन्याय चालू ठेवणे, हे न्याय व्यवस्थेच्या पायावर घाव घालणारे ठरते. कायद्यातील सध्याच्या प्रक्रियांचा गैरफायदा घेऊन गुन्हेगारांना वेळ मिळतो, हे थांबवणे अत्यावश्यक आहे. जलद न्यायालये, तातडीने चालणारे खटले, आणि दोष सिद्ध झाल्यास कठोर शिक्षा देणारी न्यायव्यवस्था ही समाजाच्या हितासाठी हवी आहे. कायद्याच्या नावाखाली जर गुन्हेगार सुटत असतील, तर कायद्यावरील समाजाचा विश्वासच उडेल.

समाजात अशा विकृत प्रवृत्ती रोखण्यासाठी कायद्याची गती आणि ताकद दाखवावी लागेल. कायद्याचा आदर करतानाच समाजाच्या सुरक्षेचे भान राखणे ही न्यायव्यवस्थेची आणि सरकारची मुख्य जबाबदारी आहे. गुन्हेगारांना पळवाट मिळणार नाही, याची पक्की हमी समाजाला मिळाली पाहिजे. गुन्हेगार कोणत्याही प्रकारे समाजात पुन्हा वावरणार नाहीत, असा विश्वास निर्माण झाला पाहिजे. समाजातील आक्रोश आणि संताप हा केवळ राग नसून एक योग्य सामाजिक चैतन्य आहे. हा आवाज दुर्लक्षित केल्यास कायद्यावरील विश्वास ढळेल. समाजाचा आक्रोश आणि कायद्याची कठोरता एकत्र येणे हीच काळाची गरज आहे.

**- डॉ. सुवर्णा कराड,**
सामाजिक कार्यकर्ते, पुणे.

# ...तर, मराठी भाषा २१५० अखेर नामशेष होईल!

## मराठी भाषा: अस्तित्वाचा संघर्ष आणि गरज - डॉ. भारत कऱ्हाड

**महाराष्ट्र** ही संतांची, साहित्यिकांची आणि बहुभाषिक समृध्दतेची भूमी. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते पु. ल. देशपांडे यांच्यापर्यंत अनेक दिग्गजांनी मराठी भाषेचा अभिमान जपला, पण आजच्या महाराष्ट्रात भाषेचा विषय अभिमानापेक्षा राजकारणाचा आणि दिखाऊ घोषणांचा भाग बनला आहे. मागील काही वर्षांत शासनाकडून मराठी भाषा वाचवण्यासाठी अनेक शासकीय निर्णय (जीआर) घेतले गेले - दुकाने आणि आस्थापनांवर मराठी फलक बंधनकारक करणे, सरकारी कार्यालयात मराठीचा वापर सक्तीचा करणे, शालेय आणि व्यावसायिक शिक्षणात मराठीला स्थान देण्याचे आदेश देणे, स्पर्धा परीक्षा मराठीतून उपलब्ध करून देणे - हे सगळे उपाय चांगले वाटतात. पण यामागे एक मोठा प्रश्न आहे - या निर्णयांची अंमलबजावणी कितपत प्रामाणिक आहे?

मुंबई महापालिकेच्या २०२३ च्या पाहणीत स्पष्ट झाले की मुंबईतील केवळ ४७% दुकाने योग्य मराठी फलक लावतात. राज्यभरातील सुमारे ८५% शासकीय कागदपत्रे अजूनही इंग्रजीत तयार होतात. कोर्टांमध्ये ९५% सुनावण्या इंग्रजीत होतात आणि नागरिकांना मराठीत न्याय मिळवणे अजून कठीण आहे. शिक्षणाच्या बाबतीतही परिस्थिती वेगळी नाही. व्यावसायिक अभ्यासक्रम मराठीत सुरू करण्याची घोषणा झाली असली तरी ७०% विद्यार्थ्यांना मराठीतून दर्जेदार पुस्तके उपलब्ध नाहीत. स्पर्धा परीक्षांसाठी मराठीत पुरेशी सामग्री नसल्यामुळे मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना अजूनही इंग्रजी पुस्तकांकडे धाव घ्यावी लागते.

या सगळ्याचा अर्थ असा की जीआर काढले जात आहेत, पण प्रत्यक्षात ते वरवरच्या स्तरावरच मर्यादित राहिले आहेत. मराठीचा वापर केवळ फलकांपुरता, सण-समारंभांपुरता आणि सरकारी कागदपत्रांच्या शीर्षकांपुरता राहतोय, पण शिक्षण, न्यायव्यवस्था, व्यवहार आणि दैनंदिन जीवनात अजूनही मराठी दुय्यम ठरत आहे. हे म्हणजे फक्त मराठीची बडिमुखी करायची आणि प्रत्यक्षात इंग्रजीला हात जोडायचे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार मातृभाषेत शिक्षण देण्यावर भर देण्यात आला आहे, पण महाराष्ट्रात त्याची अंमलबजावणी अर्धवट आहे. व्यावसायिक शिक्षणासाठी मराठी पुस्तके, तांत्रिक शब्दसंपदा आणि प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध नाहीत. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमात मराठी टिकत नाही आणि विद्यार्थी इंग्रजीकडे वळतात. राजकीय पक्ष भाषेच्या नावावर आंदोलनं करतात, भाषिक अस्मितेचे नारे देतात, पण तेच नेते स्वतःच्या प्रचारासाठी इंग्रजी वापरतात, स्वतःच्या मुलांना इंग्रजी शाळेत घालतात आणि सरकारी कामकाज इंग्रजीतच चालवतात. भाषेचा उपयोग फक्त मतं मिळवण्यासाठी आणि प्रसंगी जनतेला भावनिक बनवण्यासाठीच होतोय का, हा गंभीर प्रश्न आता पडतो आहे.

जर आपण सध्याच्या परिस्थितीवर तातडीने उपाययोजना केली नाही, तर मराठी भाषेला भविष्यात मोठा धोका निर्माण होईल. यूनेस्कोच्या जागतिक भाषाविषयक अहवालानुसार, जर एखाद्या भाषेचा वापर नवीन पिढीमध्ये घटला, तर त्या भाषेला तीन ते चार पिढ्यांत म्हणजे सुमारे ७५ ते १०० वर्षांत अस्तित्व संकट येऊ शकते. जगात सध्या दर पंधरा दिवसांनी एक भाषा लुप्त होते. २१०० पर्यंत सुमारे ५०% भाषा नामशेष होतील, असा अंदाज जागतिक तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. सध्याचा मराठी भाषेचा वापर आणि त्यातील घसरणीचा वेग बघता, जर सध्याचं धोरण आणि निष्क्रियता अशीच चालू राहिली, तर मराठी भाषेला २१००-२१५० या काळात अस्तित्वाचा गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

म्हणूनच मराठी भाषा वाचवण्यासाठी तातडीने काही ठोस आणि व्यवहार्य पावलं उचलणं अत्यावश्यक आहे. सर्वप्रथम शालेय शिक्षणात मातृभाषेला खऱ्या अर्थाने प्राधान्य दिलं पाहिजे. सर्व शाळांमध्ये, अगदी इंग्रजी माध्यमांमध्येही मराठी विषय सक्तीचा करावा आणि त्या शिकवण्याची गुणवत्ता वाढवावी. सर्व सरकारी व्यवहार, कागदपत्रे, आणि आदेश मराठीत असावेत आणि मराठीतूनच नागरिकांना सेवा दिली जावी. न्यायालयीन कामकाज जिल्हास्तरावर मराठीतच करणे बंधनकारक करावे, आणि न्यायालयीन निकाल, प्रपत्रे, अर्ज मराठीत उपलब्ध करून द्यावीत. व्यावसायिक आणि उच्च शिक्षण मराठीतून सहज आणि दर्जेदार पद्धतीने मिळाले पाहिजे. स्पर्धा परीक्षांसाठी मराठीतून दर्जेदार अभ्यास साहित्य सहज उपलब्ध करून दिले पाहिजे. आज डिजिटल युगात मराठी भाषेला जागा मिळवणे अत्यंत महत्त्वाचे आहे, म्हणून अधिकाधिक वेब पोर्टल्स, मोबाइल ॲप्स, ई-बुक्स, आणि तांत्रिक शब्दसंपदा मराठीत तयार करणे गरजेचे आहे.

मराठी भाषेला वाचवायचे असेल तर फक्त नियम करून भागणार नाही. मराठीचा वापर घराघरात, रस्त्यावर, व्यवहारात, शिक्षणात आणि डिजिटल माध्यमांमध्ये वाढवला पाहिजे. मुलांमध्ये मराठी वाचनाची आणि संभाषणाची सवय लावली पाहिजे. पालकांनी घरी मुलांशी मराठीत बोलायला सुरुवात केली पाहिजे. खाजगी क्षेत्रात - बँका, मॉल्स, हॉटेल्स, ग्राहक सेवा केंद्रे - मराठी व्यवहार बंधनकारक करायला हवे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, मराठीचा अभिमान बाळगताना इतर भाषांचा द्वेष करायचा नाही. मराठी भाषा वाचवण्यासाठी भाषिक सहिष्णुता राखली पाहिजे.

जर आपण आजच प्रयत्न केले आणि या सर्व क्षेत्रांमध्ये योग्य दिशेने काम सुरू केले, तर मराठीला फक्त वाचवता येणार नाही, तर ती २१५० पर्यंत आधुनिक आणि जागतिक भाषांमध्ये सन्मानाने वावरू शकेल. पण जर आपण निष्क्रिय राहिलो, तर पुढच्या ७५ ते १०० वर्षांत मराठीचा वापर व्यवहारातून आणि कुटुंबातून संपण्याची शक्यता आहे. फक्त सण-समारंभ, जुनी गाणी आणि आठवणीतच मराठी उरण्याचा धोका आहे. आज महाराष्ट्राला फक्त मराठी भाषा दिवस साजरा करून समाधान मानणाऱ्या लोकांची गरज नाही. महाराष्ट्राला हवी आहे अशी पिढी, जी मराठी मनापासून वापरेल, तिला आपले जीवनभाषा मानेल आणि इतर भाषांचा आदर राखत मराठीचा खरा अभिमान बाळगेल.

पु. ल. देशपांडे यांच्या अमर वाक्याने आपल्याला हेच सांगायचे आहे -

'जी व्यक्ती आपल्या भाषेवर प्रेम करते, ती इतर कुणाच्याही भाषेचा द्वेष करू शकत नाही.' मराठी ही केवळ भाषा नाही, ती आपली संस्कृती आहे, आपली ओळख आहे. ती वाचवायची की हरवायची, हे आपण ठरवायचं.

**- डॉ. भारत कऱ्हाड,**
प्राचार्य, वराडकर महाविद्यालय
दापोली, जिल्हा रत्नागिरी.

# नमामि गोदावरी कृती आराखडा अंमलबजावणी; जिल्हा प्रशासनातर्फे गोदावरी स्वच्छतेसाठी सामंजस्य करार

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

गोदावरी नदीचे प्रदूषण कमी करण्यासाठी 'नमामि गोदावरी'कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यासाठी जिल्हा प्रशासनाने आज सीएसआर बॉक्स या संस्थेशी सामंजस्य करार केला. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी ह्या करारावर स्वाक्षरी केली. जिल्ह्यातील ज्या ज्या भागातून गोदावरी नदी वाहते व नदिशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या संबंधित प्रत्येक क्षेत्रात ही संस्था आपले कार्य करेल. यासाठी ही संस्था उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून निधी उभारणार असल्याने वेगळा निधीही द्यावा लागणार नाही,हे विशेष. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने नमामि गोदावरी नदी कृती आराखड्याच्या अंमलबजावणीस मान्यता देण्यासाठी ३० एप्रिल २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. त्यानुसार नाशिक ते नांदेड या महाराष्ट्राच्या हद्दीतील गोदावरी नदीच्या स्वच्छतेची प्रक्रिया राबविण्यात येत आहे.




**'दी गोदावरी इनिशिएटीव्ह'**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातून ज्या भागातून गोदावरी नदी वाहते त्याभागात या आराखड्याची अंमलबजावणी व इतर उपक्रम करण्यात येणार आहे. त्यासाठी सीएसआर बॉक्स या संस्थेने पुढाकार घेतला असून 'दी गोदावरी इनिशिएटीव्ह' या नावाने हे अभियान राबविण्यात येत आहे. त्यासाठी ही संस्था उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून निधी उभारणार असून जिल्हा प्रशासनाने या अभियानाशी संबंधित सर्व विभागांच्या परवानग्या, आवश्यक ते सहकार्य, जनजागृती उपक्रम यासाठी सहयोग द्यावा यासाठी आज हा सामंजस्य करार करण्यात आला आहे.

सीएसआर बॉक्स या संस्थेच्या मानसी दिवाण यांनी यावेळी या करारावर जिल्हाधिकाऱ्यांसह स्वाक्षरी केली. संस्थेचे जिल्ह्याचे समन्वयक कल्पेश मोहोड, उपजिल्हाधिकारी सामान्य प्रशासन संगिता राठोड यावेळी उपस्थित होते.

गोदावरी नदी ही नाशिक (त्र्यंबकेश्वर) येथे उगम पावून पुढे अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, नांदेड या जिल्ह्यांमधून वाहत तेलंगणा राज्यात प्रवेश करते. राज्यात या नदीची लांबी ५०४ किमी आहे.

**असे राबविणार अभियान**

या अभियानांतर्गत नदी काठावर असलेल्या नगरपालिका, ग्रामपंचायती येथे घनकचरा व्यवस्थापन, पाणलोट क्षेत्र विकास, जलसंधारण उपचार (जलपुनर्भरण, बांध बंदिस्ती इ.). तसेच गाळ काढणे, जलस्त्रोतांचे बळकटीकरण करणे व यासाठी लोकसहभागासाठी जनजागृती करणे असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. शिवाय पाण्यासाठी गोदावरी नदीवर अवलंबून असलेल्या उद्योग, स्थानिक स्वराज संस्था, सिंचन व्यवस्था इ. क्षेत्रात सांडपाणी व्यवस्थापन, पाण्याचा पुनर्वापर इ. विषयी गावनिहाय आराखडा तयार करण्यात येईल. तसेच दुष्काळ प्रवण व पूरप्रवण क्षेत्रांमध्येही जलोपचार राबविण्यात येतील.

या सर्व कामांसाठी जिल्हा प्रशासनाचे संबंधित विभाग हे आपला सहयोग देतील. निधी उद्योगांच्या सामाजिक उत्तरदायित्व निधीतून उभारण्यात येईल,असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले

# गल्ले बोरगाव येथून अमरनाथ यात्रेसाठी गेलेल्या ७५ भाविकांनी घेतले बाबा बर्फानीचे दर्शन




**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

प्रति वर्षी तालुक्यातील गल्ले बोरगाव येथून मोठ्या संख्येने भाविक अमरनाथ यात्रेसाठी जम्मू काश्मीर येथे जात असतात, सालाबादप्रमाणे या ही वर्षी गल्ले बोरगाव येथून अमरनाथ यात्रेसाठी ७५ भाविक युवकांचां जथ्था अमरनाथ यात्रेसाठी गेला असून, सदर भाविकांनी दि.३ रोजी पवित्र शिवलिंग बाबा बर्फणीचे दर्शन घेतले. दरम्यान तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांनी भाविकांना यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या होत्या.

शुक्रवार दि. २६ रोजी सायंकाळी बम बम बोले, हर हर महादेवच्या जयघोषात, भाविक अर्जुन बढे, नामदेव खोसरे, खंडू फुलारे, गोरख बोडखे, मनोज कऱ्हाळे, परसराम औटे, वैभव वडगावकर, ऋषिकेश नलावडे, नामदेव तळेकर, यांच्यासह ७४ भाविकांना सर्वाचा प्रवास सुखाचा होऊ दे अशी अमरनाथ बर्फानी भोले बाबाच्या चरणी प्रार्थना करीत सर्वांना शुभेच्छा देऊन ग्रामस्थांनी भाविकांना पुढील यात्रेसाठी रवाना केले होते.

सदर भाविकांचे नुकतेच बाबा बर्फानीचे दर्शन झाले असून, दर्शनाने आम्ही धान्य झाल्याची प्रतिक्रिया या भाविकांनी दिली.

या वेळी सरपंच विशाल खोसरे, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष राजेंद्र बढे, भाजपा जिल्हा कार्यकारणी सदस्य अरुण पाटे, मुकेश राजपूत, अनिल खोसरे, बाबासाहेब वीर, ईश्वर जोशी, मानसिंग राजपूत, जितेंद्र हारदे, नंदू बूखार, नारायण शेळके, संभाजी वाघ, यांच्या सह मोठ्या संख्येने ग्रामस्थांची उपस्थिती होती.

विषय : भीमनगर भावसिंगपुरा वार्ड क्रमांक (१३) उत्तर अंतर्गत विकास कामांच्या माध्यमातून १.३४ रुपये निधीतून सिमेंट काँक्रिटीकरण करण्यासाठी सहा रस्त्यांचे उद्घाटन सोहळा आयोजित करण्यात आला होता तसेच याच परिसरात त्रिरत्न बुद्ध महासंघ केंद्र भिमनगर या ठिकाणी भव्य असा २१ फुटी बुद्ध मूर्ती चे अनावरण राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री नामदार संजय भाऊ शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले

महोदय

वरील विषयानुसार काल शनिवार दिनांक ५ जुलै २०२५ रोजी भीमनगर भावसिंगपुरा वार्ड क्रमांक १३ (उत्तर) अंतर्गत राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा पालकमंत्री नामदार संजय भाऊ शिरसाट साहेब यांच्या शुभहस्ते व या विकास कामाचे आयोजक ॲड बाबा भाऊ तायडे यांच्या पुढाकाराने

१) माता रमाई चौक ते साकेत बुद्ध विहार साई मेडिकल पर्यंतचा प्रमुख मुख्य रस्ता

२) प्राध्यापक पाईकराव सर यांचा घरापासून चा रस्ता

३) भालेराव यांच्या घरापासून चा रस्ता त्रिरत्न चौका पासून ते १५० शे फुटाच्या रस्त्या पर्यंतचा रस्ता ४) त्रिरत्न चौक ते कृष्णा राऊत सर यांच्या घरापर्यंत चा रस्ता प्राध्यापक ५) अनिल दंडाळे सरांच्या घरापासून जेतवन कॉलनी मार्गे गोगाबाबा टेकडी पर्यंतचा पोहोच रस्ता

इत्यादी सिमेंट कॉंक्रिटीकरण रस्त्याचे उद्घाटन करण्यात आले,

माता रमाई चौकामध्ये सर्वप्रथम माता रमाई चौकामध्ये माता रमाईचे अगरबत्ती हार फुलांनी अभिवादन करण्यात आले

यासह भीमनगर येथील त्रिरत्न बौद्ध महासंघ केंद्र भिमनगर याठिकानी भव्य अशी २१ फुटी बुद्ध मूर्तीचे अनावरण करण्यात आले, यावेळी बोधीनगर भावसिंगपूरा पडेगाव रोड यावेळी बोधीनगर भावसिंगपुरा पडेगाव रोड ग्लोरिया सिटी जवळ चक्रवर्ती सम्राट अशोक स्तंभ या चौकाचे अनावरण करण्यात आले

याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी महापौर नंदकुमार घोडिलेजी, प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण दीपक खरात साहेब,पोलीस निरीक्षक डॉ.विवेक जाधव साहेब,कार्यकारी अभियंता म.न.पा कोंबडे साहेब, उप अभियंता मनपा चांमले साहेब, जिल्हा उपप्रमुख रखमाजी जाधव मामा, सहाय्यक अभियंता मनपा कुलकर्णी साहेब, यांच्या प्रमुख उपस्थितीत वरील कार्यक्रमात पार पडले.

५ सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्याच्या विकास कामाचे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी,व भव्य दिव्य २१ फुटी बुद्ध मूर्तीचे अनावरण कार्यक्रम यशस्वी साठी

विकास कामांचे आयोजक ॲड. बाबा भाऊ तायडे, धम्मचारी विवेकशील,धम्मचारी ललित सिद्धी,धम्मचारी संघवंश,धम्मचारी ललित मुनी,धम्मचारी अक्षयदर्शी, तसेच सुभेदार कदम दादा, सुभेदार आरक दादा,राजूभाऊ जाधव,धम्मानंद सुरासे, प्रा.अनिल दंडाळे सर,विजय दाणे,दिलीप इंगळेजी,राजेश तिरपुडे सर, सुरज जाधव, सिद्धार्थ सरोदे, प्रा. धम्मानंद गायकवाड, ओंकार चक्रे,अड, जाधव सर, इंजिनीयर मस्के साहेब, अनिल गायकवाड सर , साबळे दादा, डॉ हर्ष बोधि , अड, खोब्रागडे सर,वडाई सर, सुशील नवगिरे, तुषार घाडगे, सुमित पवार, प्राध्यापक धावे सर, देवेंद्र वाहने सर, प्रा. सूर्यवंशी सर,सचिन बहुरे,शरद पगारे दादा,आर.पी साळवे साहेब,उषाताई वढाई, विजय दामोदर, सि.टी पगारे साहेब, अड.भैय्याजी उराडे,अर्जुन भाऊ तायडे, साबळे साहेब,शांताराम अवचार,अविनाश आडोळे,सुरडकर साहेब,

रेखाताई मेश्राम,रूपाली ताई इंगळे,वाहनेताई,रत्नप्रभा वानखडेताई,अनिताताई डोंगरे ताई,मेश्राम ताई,अलकाताई शिरसाट,लताताई थोरात,कांता ताई चाबुकस्वार,विद्याताई भवरे,छाया ताई भवरे,शिंदू बाई सावंत, सुशीला इंगळे मावशी,ऍड करूना जाधव,चारुशीलाताई डोंगरे, सुनंदा रोकडे आई, सुमन दांडगे, तुपे आई,मेघाताई वाहने,सुनंदाताई इंगळे ,वर्षाताई मेश्राम,विद्याताई कदम,कामिनीताई गोरे मॅडम,वैशाली ताई हिवाळे मॅडम,नयनताई पाटील मॅडम,भारतीताई तायडे मॅडम,वर्षाताई त्रिभुवन मॅडम,अर्चनाताई नवतुरे मॅडम, पिंकी ताई इंगळे,रागिनीताई गायकवाड मॅडम,लक्ष्मीताई इंगळे,शीलाताई खिल्लारे,

प्रदीप अडकणे,विक्रम भाऊ बचके, प्रा. समाधान धांडे सर,प्रा. गजानन दांडगे,सोनकांबळे साहेब,नवनाथ पवार साहेब,प्रभू भाऊ बनकर,सुभेदार घोबले साहेब, धनसिंग बहुरे,ऍड कदम साहेब, कांतीलाल खरात दादा,राहुल दादा वानखेडे, प्रा. मुरलीधर इंगोले,प्रभाकर भवरे,अशोक अवचारमल सर, प्रवीण पाईकराव साहेब, चंदन भाऊ तायडे, निरंजन वानखडे, अशोक शेजवळ, लक्ष्मण वाघमारे,बेस्ट अण्णा,गोंडाने सर,विजय गायकवाड साहेब, बलखंडे साहेब, पवार साहेब, जाधव साहेब,तिघोटे साहेब,विजय दांडगे साहेब,तायडे साहेब,बापूराव साळवे,समीर शेक,प्रा संजय वानखडे,बामणे काका, कानेकर साहेब,बापूराव साळवे, डॉ मिलिंद आठवले,राजेश कांबळे, धम्मानंद जाधव,सय्यद मैनोद्दिन चचा,तागडे सर,अडकिने बी एच,विदेश इंगळे,कमलाकर साळवे साहेब ,गोबले साहेब,संतोष खरात, शाहीर गायकवाड,सनी तायडे, किरण दाभाडे,जोगदंडे,वैभव अडकने,आबेद कुरेशी, जॉन श्रीसुंदर,मुकेश श्रीसुंदर,

यावेळी शेकडोच्या संख्येने महिला नागरिक व तरुण उपस्थित होते,

जिल्हा ग्रंथालय व अभ्यासिका सेवेचा लाभ घेण्याचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि.४(जिमाका)- जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर या कार्यालयामार्फत ग्रंथालय, अभ्यासिका या सेवा दिल्या जातात. या सेवांचा संस्थेत येऊन विनामूल्य लाभ घेता येतो तसेच सभासद होऊन घरी पुस्तके नेऊन सशुल्क लाभ घेता येतो. या सेवांचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सु. धों.साबळे यांनी केले आहे.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय,छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाचे २६, ग्रंथालय सदन, राधामोहन कॉलनी, खोकडपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे ग्रंथालय व अभ्यासिका आहे. ग्रंथालयात कथा, कादंबरी, काव्यसंग्रह, संदर्भ ग्रंथ, स्पर्धा परीक्षाविषयक ग्रंथ व विविध विषयांवरील दर्जेदार अशी १७ हजार ९५४ ग्रंथ उपलब्ध असुन दैनिके, नियतकालिके व इतर वाचनीय साहित्य उपलब्ध आहे. स्पर्धा परिक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका देखील असुन वाचक व विद्यार्थी ग्रंथालयात बसुन ग्रंथ, दैनिके व नियतकालिकांचे मोफत वाचन करुन शकतात.

ग्रंथ घरी घेवुन वाचन करावयाचे असल्यास ग्रंथालयाचे सभासद होणे आवश्यक आहे. वैयक्तिक सभासदाप्रमाणेच वाचन संस्कृतीचा प्रचार व प्रसार करणारी जिल्हयातील कुठलीही नोंदणीकृत संस्था जिल्हा ग्रंथालयाची संस्था सभासद होऊ शकते. जिल्हा ग्रंथालयाचे वैयक्तिक सभासद होणेकरीता अनामत रक्कम ५०० रुपये (परतावा) व अर्ज व प्रवेश शुल्क ११० रुपये (व्दिवार्षिक), तसेच संस्था सभासद होणेसाठी अनामत रक्कम २५०० रुपये (परतावा) व अर्ज व प्रवेश शुल्क ७७५ रुपये (व्दिवार्षिक) इतके आहे.तरी विद्यार्थी, नागरीकांनी ग्रंथालयाचे सभासद होवुन वाचन सेवेचा लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सु. धों.साबळे यांनी केले आहे.